मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 28 जुलै 2024 | पान- 1

# लाडकी बहीण योजनेअंतर्गत एक लाखाहून अधिक अर्ज

## योजनेच्या लाभकरीता 31 ऑगस्ट 2024 पर्यंत अर्ज करावे : महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आवाहन केले

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात आतापर्यंत 1 लाखापेक्षा अधिक महिलांचे अर्ज भरून घेण्यात आले असून शहरातील पात्र महिलांनी योजनेचा लाभकरीता 31 ऑगस्ट 2024 पर्यंत अर्ज करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे.

महिला लाभार्थ्यांना या योजनेचा मिळावा याकरीता पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्तरावर सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. योजनेचा प्रचार व प्रसिद्धीकरीता अभियानाचा आज शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपआयुक्त अण्णा बोदडे, लिपिक अभिजित डोळस, महापालिका कर्मचारी आणि रिक्षाचालक उपस्थित होते.

मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेची माहिती महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर देण्यात येत आहे. त्याचबरोबर अर्ज करण्याच्या प्रक्रियेची माहितीही देण्यात आली आहे. शहरातील विविध ठिकाणी सर्व क्षेत्रीय कार्यालयअंतर्गत विविध माध्यमाद्वारे योजनेची माहिती देण्यात येत आहे. घरोघरी हस्तपत्रिका आणि माहिती पत्रिका वितरित करण्यात येत आहेत.

पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळावा यासाठी आवश्यक कागदपत्रांसह महिला विकास महामंडळाच्या महिलांच्या आधारे ऑफलाईनपद्धतीने अर्ज भरून घेतले जात आहे. सदरचे अर्ज क्षेत्रीय कार्यालय स्तरावर ऑनलाईन पद्धतीने भरण्यात येत आहेत. शहरात विविध ठिकाणी 123 पेक्षा जास्त सुविधा केंद्र स्थापन करण्यात आले आहेत. या केंद्रांवर भेट देवून अधिकाधिक पात्र महिलांनी विहित मुदतीत अर्ज करावा, असे आवाहन आयुक्त सिंह यांनी केले आहे.



### क्षेत्रीय कार्यालय स्तरावर रिक्षांद्वारे करणार प्रचार

» मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ शहरातील प्रत्येक महिला लाभार्थ्याला घेता यावा यासाठी महापालिका स्तरावर सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. शहरात या योजनेचा प्रचार व प्रसिद्धी रिक्षांच्या माध्यमातून करण्यात येणार असून या उपक्रमाचा शुभारंभ आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आला.

### 123 पेक्षा जास्त सुविधा केंद्र स्थापन

» "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनेचा पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळावा यासाठी आवश्यक कागदपत्रांसह महिला विकास महामंडळाच्या महिलांच्या आधारे ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरून घेऊन त्यानंतर ते अर्ज क्षेत्रीय कार्यालय स्तरावर ऑनलाईन पद्धतीने भरण्यात येत आहेत. तसेच महापालिकेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी १२३ पेक्षा जास्त सुविधा केंद्र स्थापन करण्यात आले आहेत. या केंद्रांवर भेट देवून जास्तीत जास्त पात्र महिलांनी दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत विहित मुदतीत अर्ज भरून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### हस्तपत्रिका, पॅम्प्लेट्स घरोघरी वितरित

» स्टँडीज, फ्लेक्स, बॅनर्स सर्व क्षेत्रीय कार्यालयअंतर्गत निश्चित केलेल्या ठिकाणी आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच पालिकेच्या व्हीएमडीवरही योजनेचा लाभ घेण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त योजनेचे माहितीदर्शक व्हिडीओ, मेसेजेस, जिंगल्स तयार करून प्रसारित करण्यात येत असून योजनेची माहितीदर्शक भित्तीपत्रके लावण्यात येत आहेत. तसेच हस्तपत्रिका आणि पॅम्प्लेट्स तयार करुन घरोघरी वितरित करण्यात येत आहेत..

# भोसरीतील अर्बन स्ट्रीटच्या अर्धवट कामामुळे निष्पाप नागरिकाचा मृत्यू

## राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाखालील अर्धवट अर्बन स्ट्रीटचा लोखंडी गज छातीमध्ये घुसल्याने एकाचा मृत्यू झाला

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरीतील राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाखालील अर्धवट अर्बन स्ट्रीटचा लोखंडी गज छातीमध्ये घुसल्याने एकाचा मृत्यू झाला. दिलीप बवले (वय 54) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

भोसरीतील गव्हाणे वस्ती परिसरात राहणारे बवले हे शुक्रवारी रात्री आठ वाजता या अर्बन स्ट्रीट समोरील रस्त्याने जात होते. त्यांची गाडी मारुती शोरूम समोर स्लिप झाली. ते थेट या कठड्यांच्या बाहेर आलेल्या लोखंडी गजावर जाऊन पडले. हा लोखंडी गज बवले यांच्या छातीमध्ये आरपार घुसला. त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी दवाखान्यात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या पूर्वीही या लोखंडी गजांमुळे नागरिक जखमी झाल्याच्या घटना घडल्या होत्या. मात्र आता हा अर्बन स्ट्रीट नागरिकांच्या जीवावर उठला असल्याचा आरोप होत आहे.

करदात्या नागरिकांच्या खिशातील तब्बल 42 कोटी हुन अधिक रक्कम या अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली लाटण्यात आली. मात्र आता हाच अर्बन स्ट्रीट नागरिकांच्या जीवावर उठला आहे.अर्बन स्ट्रीट डेव्हलपमेंट या गोंडस नावाखाली तब्बल 43 कोटी रुपये खर्च करून केलेल्या अर्धवट कामामुळे एका नागरिकाला आपला जीव गमवावा लागला आहे. याप्रकरणी महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि अन्य जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी भोसरी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.



### ठेकेदार, अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

» अपघात प्रकरणाची चौकशी करून अशा प्रकारे चुकीचे व अर्धवट काम केलेल्या संबधित ठेकेदारावर व अधिकाऱ्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा तसेच तातडीने भोसरी उड्डाणपूलाखाली ज्या ठिकाणी असे धोकादायक लोखंडी गज दिसून येतात त्या ठिकाणी सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात व भविष्यात होणाऱ्या दुर्घटना टाळाव्यात अन्यथा आंदोलन करण्यात येईल असे अजित गव्हाणे यांनी म्हटले आहे.

### काम अर्धवट सोडल्यामुळे फटका

»अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली या ठिकाणी तब्बल 42 कोटीहून अधिक खर्च झालेला आहे. अर्बन स्ट्रीटचे काम सुरू असताना अचानक येथील स्थानिक आमदार आणि प्रशासनाने अर्बन स्ट्रीटचे काम रद्द केले. चांदणी चौकातील अर्बन स्ट्रीटचे काम अर्धवट सोडल्यामुळे दोन्ही बाजूचे कठडे, या कठड्यांचे लोखंडी गज बाहेर आलेले होते. ते तसेच पडून होते. याकडे आमदार आणि प्रशासनाने सोईस्करपणे दुर्लक्ष केले. याचा फटका मात्र शुक्रवारी एका निष्पाप जीवाला बसला असल्याचा आरोप केला जात आहे.

# पूजा खेडकर कुटुंबियांची थर्मोव्हेरिटा कंपनीचा लिलाव होणार?

## कंपनी पालिकेकडून सील; हाच पत्ता वापरुन पूजा खेडकरांनी मिळवलं होतं अपंगत्वाचे प्रमाणपत्र

**पुणे | प्रतिनिधी**

वादग्रस्त आयएएस ट्रेनी अधिकारी पूजा खेडकर प्रकरणातील थर्मोव्हेरीटा कंपनीचा लिलाव होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संबंधित कंपनीने २ लाख ७२ हजारांचा कर अद्यापही भरला नाही. आधीच जप्तीची कारवाई केलेल्या कंपनीचा लिलाव होऊ शकतो, अशी माहिती करसंकलन विभागाचे प्रमुख निलेश देशमुख यांनी दिली आहे.

आयएएस ट्रेनी अधिकारी पूजा खेडकर या वेगवेगळ्या वादग्रस्त प्रकरणामुळे अडचणीत आल्या आहेत. पूजा खेडकर यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील थर्मोव्हेरिटा कंपनीचा पत्ता देऊन वायसीएम रुग्णालयातून सात टक्के दिव्यांग प्रमाणपत्र मिळवलेलं आहे. पूजा खेडकर यांनी दिव्यांग प्रमाणपत्रासाठी रेशन कार्ड ओळखपत्र म्हणून दिलं होतं. या रेशन कार्डवर याच कंपनीचा पत्ता आहे. या प्रकरणात या कंपनीवर जप्तीची नोटीस आधीच देण्यात आली असून आता लिलाव होण्याची शक्यता आहे.

वादग्रस्त IAS अधिकारी पूजा खेडकरांनी अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी कंपनीच्या पत्त्याचा वापर केला. त्याच थर्मोव्हेरिटा कंपनीचा आता लिलाव केला जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या कंपनीने गेल्या तीन वर्षांचा 2 लाख 77 हजारांचा कर थकवला आहे. या प्रकरणी पिंपरी पालिकेने कंपनी सील केलेली आहे. मात्र हा कर 21 दिवसांत भरला नाही तर मालमत्तेचा लिलाव केला जातो, त्या नियमानुसार थर्मोव्हेरिटा कंपनीचा लिलाव केला जाऊ शकतो. फक्त पालिका ही इच्छाशक्ती दाखवणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

खेडकर कुटुंबाची थर्मोव्हेरिटा कंपनी ही अनधिकृत असल्याचं उघड झालं आहे. 2 लाख 77 हजारांचा कर थकवल्याप्रकरणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने थर्मोव्हेरिटा कंपनी 19 जुलैला सील केली आहे. ही कंपनीच अनधिकृत असल्याचीही माहिती समोर आली होती. रेडझोनमध्ये कंपनी उभारल्यामुळे ती अनधिकृत असल्याचं स्पष्ट झालं होतं.

पूजा खेडकर यांनी दिव्यांग प्रमाणपत्र मिळवण्यासाठी याच थर्मोव्हेरिटा कंपनीचा पत्ता रहिवासी पत्ता म्हणून दिला होता. पिंपरी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी एबीपी माझाला यासंदर्भात एक्सक्लुझिव्ह माहिती दिली आहे. पिंपरी पालिकेचा कर थकवल्याप्रकरणी थर्मोव्हेरिटा कंपनीवर अखेर आज कारवाईचा बडगा उगारला आहे. 2 लाख 77 हजारांचा कर थकविला म्हणून आज कंपनी सील करण्यात आली आहे.

आता कंपनी बाबत कोणताही निर्णय घ्यायचा असेल तर खेडकर कुटुंबियांना आधी पालिकेची परवानगी घ्यावी लागणार आहे, सोबतच आधी थकीत कर ही भरावा लागणार आहे. याच कंपनीचा पत्ता वापरून IAS पूजा खेडकर यांनी अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळविले आहे. हीच कंपनी अनधिकृत असल्याचं ही समोर आलेलं आहे, त्याअनुषंगाने ही पालिकेकडून कारवाई सुरू आहे.



### थर्मोव्हेरिटा कंपनीचा तब्बल 2 लाख 77 हजारांचा कर थकीत

» पिंपरी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे एबीपी माझाशी बोलताना सांगितलं, "रेकॉर्ड तपासल्यानंतर असं दिसून आलं की, 2009 पासून कर भरला जात होता, शेवटचा कर 2022 मध्ये भरण्यात आला होता. आतापर्यंतचा थकीत कर पाहिला तर तब्बल 2 लाख 77 हजारांचा थकीत कर आहे. त्यामुळे नियमानुसार, प्रॉपर्टी जप्त करण्याची जी कारवाई आहे, ती सुरु करण्यात आली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियमात तरतूद आहे. जर एखाद्या प्रॉपर्टीवर कर देण्यात कोणी हलगर्जीपणा करत असेल किंवा कर वेळेत भरत नसेल, तर ती प्रॉपर्टी जंगम मालमत्ता आणि स्थावर मालमत्ता स्थिर करतो, त्या नियमानुसार आपली कारवाई केली जाईल."

### कंपनीचा भाग रेड झोनमध्ये

» "कंपनी ज्या भागात येते, तो भाग रेड झोनमध्ये येतो, त्यामुळे त्या भागातील सर्व कंपन्या अनधिकृत आहेत. त्यामुळे या कंपनीवर कारवाई केली जाईल. नियमांनुसार, अनधिकृत इमारत असेल, तर संबंधित मालकांना एक महिन्याची नोटीस दिली जाते. त्यानंतर जी काही योग्य कारवाई असले, ती त्यांच्यावर केली जाते.", असं पिंपरी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी सांगितलं आहे.

### कंपनीवर लिलावाची टांगती तलवार

» एप्रिल २०२२ पर्यंत संबंधित कंपनीने नियमित कर भरलेला आहे. परंतु, त्यानंतर दोन वर्षांचा २ लाख ७२ हजार कर थकीत आहे. याबाबत मार्च महिन्यात जप्तीपूर्व नोटीस दिलेली आहे. सध्या अधिपत्र बजावण्यात आलं असून त्यांची मालमत्ता जप्त केलेली आहे. अधिपत्र बजावण्यात आल्यानंतर २१ दिवसाच्या आत कर भरावा लागतो. अन्यथा संबंधित मालमत्तेचा लिलाव किंवा विक्रीला काढण्याची शक्यता असते. त्यामुळे सध्या तरी आयएएस अधिकारी पूजा खेडकर प्रकरणातील थर्मोव्हेरिटा कंपनीवर लिलावाची टांगती तलवार आहे.

# शिवाजीनगर-हिंजवडी मार्गावरील मेट्रो कामाला मिळाली गती!

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील डबल डेकर पूल आणि पिंपरी-चिंचवड हद्दीतील 17 किलोमीटरचा वायडक्ट ही महत्त्वाची आणि जोखमीची कामे पूर्ण झाली आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रो मार्गावरील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील डबल डेकर पूल आणि पिंपरी-चिंचवड हद्दीतील १७ किलोमीटरच्या वायडक्ट ही महत्त्वाची आणि जोखमीची कामे पूर्ण झाली आहेत. शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रो मार्गावरील वरील दोन कामे महत्त्वाची आणि धोक्याची असल्याने मेट्रोने या मार्गावरील महत्त्वपूर्ण कामामध्ये यश मिळाल्याचे मानले जाते. यामुळे खऱ्या अर्थाने शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो कामाला गती मिळाली आहे. दरम्यान, उरलेले ३२ टक्के काम नियोजित वेळेत म्हणजेच पुढील आठ ते नऊ महिन्यात पूर्ण करण्याचा मेट्रोचा मानस आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराला लागूनच असलेली दुसरी मेट्रो लवकरच कार्यान्वित होणार आहे.

मेट्रोचे एकूण ६८ टक्के काम पूर्ण झाले असून ३२ टक्के काम सध्या शिल्लक आहे. ८ महिन्यात उर्वरित कामे केली जातील, अशी माहिती 'पीएमआरडीए'ने दिली. शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रोचे काम सार्वजनिक- खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर टाटा समूहाने काम हाती घेतले आहे.

पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्याकडे या प्रकल्पाचे नियंत्रण आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोर डबल डेकर बसविण्याचे काम सुरू होते. हे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. १७ किलोमीटर वायडक्ट बसविण्याचे काम सुरू होते. ते काम देखील पूर्ण करण्यात आले आहे. वाकड आणि हिंजवडी (फेज १) या भागात गर्डर आणि खांबावर पिअर कॅम्प बसविण्यात आले आहे.

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गाचे खांब बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. या कामाबरोबरच स्थानक उभारणीचे काम सुरू आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गापैकी वाकड चौक ते मेगापोलीस सर्कल हे अंतर साडे आठ किलोमीटरचे असून एकूण नऊ स्थानके असणार आहेत. हे काम लवकरच पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती 'पीएमआरडीए'च्या वतीने देण्यात आली.



### मेट्रोची चाचणी घेण्यात येणार

» शिवाजीनगर ते हिंजवडी-माण या तिसऱ्या मेट्रो मार्गाचे काम सध्या प्रगतिपथावर आहे. २३ किलोमीटरचा हा मार्ग असून या प्रकल्पासाठी ८ हजार ३१३ कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. कामाला अद्याप नऊ महिन्यांची मुदत शिल्लक आहे. त्या मुदतीच्या आत ही कामे पूर्ण करून घेण्यात येतील, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. तसेच रूळ बसविल्यानंतर मेट्रोची चाचणी घेण्यात येणार आहे.

> " मेट्रोबाबत आयुक्तांनी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात येत आहे. तसेच कामाची गती वाढली असून, नियोजित वेळेमध्ये काम पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. त्या कामाचा आढावा वेळोवेळी घेण्यात येत आहे . काम करताना वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत.
>
> **- रिनाज पठाण, कार्यकारी अभियंता, पीएमआरडीए .**

# शहरातील 4 हजार 500 नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर!

## अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत : महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे शहरातील विविध ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाल्यानंतर नदीकाठच्या घरांमध्ये तसेच सखल भागात पाणी साचल्याच्या घटना घडल्या होत्या. धोकादायक ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या सुमारे ४ हजार ५०० नागरिकांना महानगरपालिकेने सुरक्षित स्थळी स्थलांतरित केले. रात्री उशीरापर्यंत बचावकार्य सुरू होते. पूर परिस्थिती निवळल्यानंतर रस्ता तसेच परिसरात साचलेला गाळसदृश कचऱ्याची महापालिकेच्या पथकाने संपुर्ण परिसर स्वच्छ केला आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.




‘अ’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील सम्राट चौक, लालटोपी नगर, भाटनगर, पिंपरी रिव्हर रोड, रामनगर, पत्राशेड लिंकरोड, बौद्धनगर आदी ठिकाणी बचावकार्य करण्यात आले असून सुमारे ८५० नागरिकांना भाटनगर पिंपरी शाळा, आंबेडकर कॉलनी, मेवाणी हॉल, निराधार हॉल पिंपरी येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.

‘ब’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील चिंचवड येथील तानाजी नगर, काळेवाडी येथील पवनानगर, रावेत येथील समीर लॉन्स, शिंदे वस्ती रस्ता, जाधव घाट आदी परिसरात बचावकार्य करण्यात आले असून २०० नागरिकांना काळेवाडी येथील महापालिकेच्या प्राथमिक शाळेत, ७० नागरिकांना मनपा चापेकर शाळा, उर्दू शाळा व भोईल हॉल येथे तर १५० नागरिकांना वाल्हेकरवाडी येथील नवीन प्राथमिक शाळा इमारत येथे स्थलांतरित करण्यात आले.

‘ड’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीत लक्ष्मीनगर, पवार वस्ती, भुमकर वस्ती, चोंदे घाट, शिक्षक सोसायटी, लक्ष्मी कॉलनी, ओम शिव कॉलनी, दत्तमंदिर रोड, पिंपळेगुरव, भुजबळ वस्ती, वाकड आदी परिसरात बचावकार्य करण्यात आले असून २३० नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यात आले आहे.

‘ई’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीत रामनगर, बोपखेल येथे २० ते २५ घरांमध्ये तीन ते चार फुट पाणी शिरले होते. याठिकाणी बचावकार्य करण्यात आले असून सुमारे १७० नागरिकांचे मनपाच्या बोपखेल येथील प्राथमिक शाळेत स्थलांतरण करण्यात आले आहे.

‘फ’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीत घरकुल, श्रीराम कॉलनी, तळवडे, डिफेंस कॉलनी, पाटीलनगर, चिखली आदी परिसरात बचावकार्य करण्यात आले. या ठिकाणांहून साचलेले पाणी तसेच घरांमध्ये शिरलेले पाणी काढण्यात आले आहे.

### पाणी उतरल्यानंतर स्वच्छतेची कामे सुरू...

» शहरातील विविध ठिकाणी साठलेले पाणी निवळल्यानंतर आज महापालिका पथकाच्या वतीने शहरातील विविध भागात तुंबलेल्या चेंबर्सची स्वच्छता करणे, रस्त्यावरील गाळ काढणे, नदीकाठी जमा झालेल्या कचरा तसेच गाळ जेसीबीच्या सहाय्याने हटविणे, माती साचलेल्या ठिकाणी पाणी फवारणी करून स्वच्छता करणे, विविध ठिकाणी निर्जंतुकीकरण करणे तसेच निवारा केंद्रांमध्ये भोजन आणि आदी व्यवस्था करणे अशी विविध कामे करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने मनपा बोपखेल शाळा, मोशी येथील काही परिसर, घरकुल, पिंपळेगुरव, जुनी सांगवी बोपोडी रस्ता आदी परिसरांचा समावेश होता.

तसेच २५ नागरिकांना जवळच्या रिक्त फ्लॅटमध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे.

‘ग’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीत संजय गांधी नगर, आंबेडकर नगर, सुभाष नगर, वाल्मिकी आश्रम, पवना नगर, जगताप नगर, संजय गांधी नगर या ठिकाणी बचावकार्य करण्यात आले असून सुमारे ५२३ नागरिकांना कमला नेहरू शाळा, पिंपरी येथे, ५५० नागरिकांना रहाटणी शाळा येथे, ११० नागरिकांना थेरगाव शाळा येथे तर ५५ नागरिकांना विवेकानंद बॉक्सिंग हॉल येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.

‘ह’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीत हिराबाई झोपडपट्टी, कासारवाडी, भारत नगर, फुगेवाडी, दापोडी परिसर मुळानगर, मधुबन सोसायटी, जुनी सांगवी आदी ठिकाणी बचावकार्य करण्यात आले असून २०० नागरिकांचे कासारवाडी उर्दू शाळेत, सुमारे ३०० नागरिकांचे मीनाताई ठाकरे महापालिका शाळेत, सुमारे २५० नागरिकांचे दापोडी येथील हुतात्मा भगतसिंग महापालिका शाळेत स्थलांतर तर सुमारे ३५० नागरिकांचे जुनी सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शाळेत स्थलांतर करण्यात आले आहे. अद्याप शहरातील विविध ठिकाणी नियंत्रण पथके तैनात असून बचावकार्य सुरू आहे.

# तिन्ही मतदारसंघात मनसे देणार तिसरा पर्याय

## आगामी विधानसभा निवडणुकीत मनसे 225 ते 250 जागा लढणार : राज ठाकरे यांची घोषणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरुवारी (25 जुलै) मुंबईत पदाधिकाऱ्यांचा मेळाव्यात विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले. आगामी विधानसभा निवडणुकीत 225 ते 250 जागा लढणार असल्याची घोषणा केली. त्यामुळे पिंपरी चिंचवड आणि भोसरी विधानसभेसाठी मनसेकडून आमदारकीसाठी लढवणाऱ्या इच्छुकांच्या आशा पल्लवीत झालेल्या आहेत.



चिंचवड विधानसभा मतदारसंघातून युवा नेते हेमंत डांगे हे इच्छुक आहेत. पिंपरी विधानसभा मतदारसंघ राखीव असल्याने या ठिकाणी के. के. कांबळे आहेत. तर भोसरी साठी शहराध्यक्ष सचिन चिखले व अंकुश तापकीर हे विधानसभा निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. तसेच महाविकास आघाडी व महायुतीकडून अनेकांनी उमेदवारासाठी रणसिंग फुंकले आहेत.

यामध्ये चिंचवड विधानसभा मतदारसंघातून विद्यमान आमदार अश्विनी जगताप, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते, राहुल कलाटे, शत्रुघ्न उर्फ बापू काटे, सिद्धेश्वर बारणे, भाऊसाहेब भोईर यांच्यासह अनेक जण इच्छुक आहेत. पिंपरी विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार गौतम चाबुस्कवार, सीमा सावळे तर भोसरी विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार महेश लांडगे, अजित गव्हाणे, विलास लांडे, सुलभा उबाळे, रवी लांडगे हे तीव्र इच्छुक आहेत. अशा वेळी आघाडी आणि युती याच्यकडून प्रत्येकी एकाला उमेदवारी मिळणार आहे. अशा वेळी तिसरा पर्याय म्हणून आयत्यावेळी वरील दिग्गज मनसे कडून उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरतील हे नक्की..... त्यामुळे निवडणूक जस जशी जवळ येईल तसे राजकारणाला नवनवीन रंग येणार आहेत असे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे.

दरम्यान राज ठाकरे यांच्या या वक्तव्यानंतर आता मनसेच्या काही नेत्यांनी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केल्याचं चित्र आहे. मनसेचे पुणे शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांनी हडपसर विधानसभा मतदारसंघावर दावा केला आहे. त्यामुळे वसंत मोरे यांनी मनसे सोडल्यानंतर आता हडपसरमधून मनसेचा नवा शिलेदार रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. साईनाथ बाबर यांनी व्हाट्सअप स्टेट्स ठेवत तयारीला सुरुवात केली आहे.

# मुसळधार पावसानंतर उखडलेल्या रस्त्यांवर मलमपट्टी सुरू

## शहरात सर्वत्र ठिगळांवर पुन्हा ठिगळं लावण्याची वेळ : पथ विभागाच्या निष्कृट कामाचे पितळ उघडे



**पुणे | प्रतिनिधी**

शहरासह उपनगर भागात पावसाने दमदार हजेरी लावली. यामुळे शहराची दैना उडाली आहे. रस्त्यावर नुकतेच नव्याने टाकण्यात आलेले डांबर उखडले असून खड्डे पडले आहेत. तसेच यापूर्वी रस्त्यावर पॅच मारून ठिगळे लावण्यात आली होती. त्याच ठिगळांवर आता खड्डे पडल्याने त्यावर पुन्हा ठिगळे लावण्याची वेळ महापालिकेवर आल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

महापालिकेच्या पथ विभागाने यंदा चांगले रस्ते पुणेकरांना देणार असल्याचा दावा केला होता. मात्र या दाव्याचा विसर पथ विभागाला पडला असल्याचे दिसून येत आहे. गुरुवारी (दि. २५) शहरात तब्बल ११४.१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. या पावसामुळे पुणे महापालिकेच्या पथ विभागाने केलेल्या निष्कृट दर्जाच्या कामाचे पुन्हा एकदा पितळ उघडे पडले आहे.

शहरातील रस्त्यांवर खड्डे पडलेल्या ठिकाणी पथ विभागाने पॅच मारले होते. त्यामुळे समतल रस्त्याच्या मधेच उंचवटे तयार झाले होते. त्यानंतर आता पुन्हा याच पॅचवर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे मागचे दिवस पुन्हा पुढे आल्याचे चित्र सध्या शहरात दिसून येत आहे. मुसळधार पावसात महापालिकेचे रस्ते तग धरत नसल्याचे अनेक वेळा स्पष्ट झाले आहे. ठेकेदारांनी केलेल्या निष्कृट दर्जाच्या कामाचे दर्शन आता होऊ लागले आहे. त्यामुळे पावसाळ्यात दरवर्षीप्रमाणे शहरातील पडलेल्या खड्डयांमधून रस्ता शोधत त्यातून मार्ग काढण्याची वेळ वाहनचालकांवर आली आहे.

**म्हणे, सव्वा वर्षात ७,२८३ खड्डे बुजवले; केवळ २३ शिल्लक**

दरम्यान, रस्त्यांवरील खड्डयांबाबत पुणे महापालिकेने सात हजाराहून अधिक खड्डे बुजवल्याचा दावा केला आहे. १ मार्च २०२३ पासून शहरात एकूण ७,२८३ खड्डे बुजविल्याचा दावा महापालिकेने केला आहे. मात्र बुजवलेले खड्डेच पुन्हा उखडले आहेत की नव्याने खड्डे तयार झाले आहेत, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जाऊ लागला आहे. आता पुणे महापालिकेला खड्डे बुजविण्यासाठी पुन्हा पैसे खर्च करावे लागणार आहेत.

पुणे महापालिकेने शहरातील तब्बल ७,२८३ खड्डे बुजवल्याचा दावा केला आहे. मात्र अद्यापही उपनगरातून शहरांना जोडणाऱ्या रस्त्यांवर खड्डयांचे साम्राज्य असल्याने वाहनचालकांचे कंबरडे मोडत आहे.

महापालिकेच्या पथ विभागाकडून रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजवण्यासाठी पॅच मारले आहेत. त्याचाही त्रास वाहनचालकांना सहन करावा लागत आहे. शहरात सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजना, सांडपाणी व्यवस्थापन, एटीएमएस सिग्नल यंत्रणा, खासगी कंपन्या आदी कामांसाठी वर्षभर खोदकाम केले जाते. जेथे खोदकाम केले जाते तेथे जास्त खड्डे तयार होतात. काही ठिकाणी पथ विभागाने रस्ता तयार करूनही पुन्हा रस्ते खोदल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे यंदाही रस्त्यांवरील खड्डयांमुळे पुणेकरांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. महापालिकेच्या दाव्यानुसार सध्या शहरातील रस्त्यांवर केवळ २३ खड्डे शिल्लक आहेत. मात्र, प्रत्यक्षात आजही रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे दिसून येत आहेत. सिंहगड रोडवर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने वाहनचालकांना मार्ग काढावा लागत आहे.

**खड्डे बुजवण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्येकी एक कोटी रुपये**

**» शहरातील १२ मीटरपेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांचे बांधकाम आणि देखभाल दुरुस्तीचे काम महापालिकेच्या रस्ते विभागाच्या मुख्य विभागामार्फत केले जाते. १२ मीटरपेक्षा कमी रुंदीचे रस्ते क्षेत्रीय कार्यालयामार्फत बांधून त्यांची देखभाल केली जाते. शहरातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी प्रशासनाने १५ क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याद्वारे रस्त्यांवरील खड्डे दूर करण्यात आल्याचे रस्ते विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. मात्र, हजारो खड्डे खरोखरच दुरुस्त झाले असतील तर रस्त्यांवरील खड्डयांचे प्रमाण का कमी होत नाही, असा प्रश्न नागरिकांकडून तसेच वाहनचालकांकडून उपस्थित केला जात आहे.**

> महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांकडून त्या त्या भागातील खड्डे बुजविण्याचे काम केले जात आहे. काही ठिकाणी पॅच मारलेल्या ठिकाणी खड्डे पडले आहेत. नव्याने खड्डे तयार झाले आहेत. ते तत्काळ बुजवले जात आहेत.
>
> **- साहेबराव दांडगे, अधीक्षक अभियंता, पथ विभाग, पुणे महापालिका.**

# कात्रज येथून वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह सापडला

## डेंगळे पुलाखाली एक मृतदेह पाण्यात आढळून आला : अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढला



**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज येथून पाण्यात वाहून गेलेल्या युवकाचा मृतदेह अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढला. आज सकाळी दहा वाजता मनपा भवनालगत असलेल्या डेंगळे पुलाखाली एक मृतदेह पाण्यात आढळून आला. अग्निशमन दलाचे जवान यांनी जीवरक्षक राजू काची यांच्या मदतीने या युवकाचा मृतदेह बाहेर काढून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला.

शहरात बुधवारी झालेला मुसळधार पाऊस आणि आलेले पाणी यामुळे त्यादिवशी सायंकाळी कात्रज लेकटाऊन येथून एक युवक अक्षय साळुंखे (वय २६) वाहून गेल्याची नोंद अग्निशमन दल नियंत्रण कक्षात सायंकाळी सहाच्या सुमारास झाली होती.

त्यानुसार त्याचवेळी अग्निशमन दलाकडून प्रथम गंगाधाम अग्निशमन केंद्र येथून वाहन पाठवत शोध घेण्यात आला होता. परंतु, धरण क्षेत्रातून वाढता विसर्ग व पाण्याचा प्रवाह पाहता अनेक अडचणी येत होत्या. त्यामुळे त्यादिवशी शोध घेऊन ही युवक सापडला नाही. दुसऱ्या दिवशी दलाने घटनेचे गांभीर्य ओळखून गंगाधाम व कात्रज अग्निशमन वाहन लेकटाऊन व जनता अग्निशमन वाहन शंकर महाराज मठाजवळ, स्वामी विवेकानंद पुतळा आणि आज कसबा येथील वाहन मनपा जवळील नदीपात्र येथे रश्शी, गळ, लाईफ जॅकेट, लाईफ रिंग याचा वापर करत युध्दपातळीवर शोधकार्य करीत होते. त्याचवेळी आज सकाळी दहा वाजता मनपा भवनालगत असलेल्या डेंगळे पुलाखाली एक मृतदेह पाण्यात आढळून येताच अग्निशमन दलाचे जवान यांनी जीवरक्षक राजू काची यांच्या मदतीने या युवकाचा मृतदेह बाहेर काढून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला.

सदर घटनेत अग्निशमन प्रमुख देवेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशमन अधिकारी सुभाष जाधव, प्रदिप खेडेकर, सुनिल नाईकनवरे, कमलेश चौधरी आणि सुमारे वीसच्या आसपास जवान यांनी सहभाग घेतला. तसेच या घटनेत पोलिस विभाग, जीवरक्षक, ड्रेनेज विभाग यांचे ही सहकार्य लाभले.